


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ३०९ वा शुक्रवार दि २७ फेब्रुवारी २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# शरद पवार पुन्हा एकदा केंद्रस्थानी, महायुती मविआचा तो उमेदवार पाडणार? दुसरी मत गेम करणार?

वृत्तसंस्था/मुंबई

राज्यसभेच्या ३७ जागा रिक्त होत असून त्यातील ७ जागा महाराष्ट्रातील आहेत. यातील ३ जागा महायुतीच्या आणि ४ जागा महाविकास आघाडीच्या आहेत. पण महायुतीकडे असलेलं आताचं संख्याबळ पाहता ७ पैकी ६ जागा त्यांना सहज जिंकता येतील. तर दुसरीकडे महाविकास आघाडी एकत्र राहिली आणि त्यांनी समन्वय राखला तर त्यांना १ जागा जिंकता येईल. राष्ट्रवादी शपचे अध्यक्ष शरद पवार, फौजिया खान, शिवसेना उबाठाच्या खासदार प्रियंका चतुर्वेदी, काँग्रेसच्या खासदार रजनी पाटील यांचा राज्यसभेचा कार्यकाळ २ एप्रिलला संपेल. १६ मार्चला राज्यसभेची निवडणूक होणार आहे. शरद पवार यांच्यासाठी त्यांच्या खासदारकन्या सुप्रिया सुळे यांनी फिल्डींग लावण्यास सुरुवात केली आहे. दिल्लीत असलेल्या सुळे काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याशी चर्चा करणार आहेत. राष्ट्रवादी शपचे नेते जयंत पाटील, शशिकांत शिंदे यांनी शिवसेना उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडे भेटीसाठी वेळ मागितला आहे. दुसरीकडे काँग्रेसनं राज्यसभेच्या एकमेव जागेसाठी उद्धव ठाकरेंशी चर्चा सुरु केली आहे. राज्यसभा काँग्रेसला सोडा आणि मे महिन्यात रिक्त होत असलेली विधान परिषदेची जागा शिवसेनेला घ्या, अशी ऑफर काँग्रेसकडून ठाकरेंना देण्यात आली आहे. मे महिन्यात ठाकरेंची विधान परिषदेची टर्म संपणार आहे. २०१९ मध्ये ठाकरे मुख्यमंत्री झाले. त्यामुळे ते परिषदेच्या माध्यमातून आमदार झाले आणि संसदीय राजकारणात आले. आता ते पुन्हा एकदा परिषदेवर जाणार की अन्य कोणाला संधी देणार याकडे राजकीय वर्तुळाचं लक्ष लागलं आहे. राज्यसभा आणि विधान परिषदेसाठी काँग्रेस आणि शिवसेना उबाठा यांच्यात वाटाघाटी झाल्यास शरद पवार ंचा राज्यसभेचा मार्ग बिकट होऊ शकतो. शरद पवार यांचा पक्ष विलिनीकरणाच्या माध्यमातून सत्तेत जाणार होता. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार होत्या. शरद पवार यांच्याच पक्षाच्या नेत्यांकडून तसे दावे केले जात होते. आता याच दाव्यांमुळे त्यांच्या पक्षाची कोंडी झाली आहे. शरद पवार मविआकडून राज्यसभेवर गेले आणि पुढे विलिनीकरण झालं, तर मग आपली एक जागा कशाला घालवायची, अशी चर्चा काँग्रेसच्या गोटात आहे.





शरद पवार यांचे सर्वपक्षीय संबंध पाहता, त्यांची ज्येष्ठता पाहता, राज्यसभेची रिंगणात खुद्द पवार उतरणार असतील, तर ही निवडणूक बिनविरोध होऊ शकेल. किंबहुना निवडणूक बिनविरोध होत असल्याची खात्री पटल्यावरच शरद पवार अर्ज दाखल करतील. शरद पवार दोनवेळा राज्यसभेवर गेले आहेत. दोन्ही वेळा निवडणूक बिनविरोध झालेली आहे. शरद पवार यांची संसदीय कारकीर्द ५९ वर्षांची आहे. या कालावधीत ते एकही निवडणूक हरलेले नाहीत. शरद पवार राज्यसभा निवडणुकीच्या रिंगणात नसतील, तर निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता धूसर होते. काँग्रेस किंवा ठाकरेसेनेचा उमेदवार असेल तर महायुती सातवा उमेदवार देऊन मोठा गेम करु शकते. शरद पवार निवडणूक रिंगणात नसतील तर त्यांच्या पक्षाची १० मतं कुठे जाणार हा प्रश्न आहे. महायुतीनं सातवा उमेदवार दिल्यास काँग्रेस, ठाकरेसेनेची मतं फुटू शकतात. २०२२ मध्ये महाविकास आघाडी सत्तेत असताना राज्यसभा आणि विधान परिषदेच्या निवडणुकांमध्ये मविआची मतं फुटली होती. तेव्हा मविआ सत्तेत होती. २०२२ मध्ये देवेंद्र फडणवीस विरोधी पक्षनेते होते. त्यावेळी मविआतील अंतर्गत मतभेदांचा फायदा घेत त्यांनी राज्यसभा, विधान परिषदेच्या निवडणुकांमध्ये भाजपचे अतिरिक्त उमेदवार निवडून आणले. त्यावेळी मविआची मतं फुटली. क्रॉस व्होटिंग झालं. दुसऱ्या पसंतीच्या मतांच्या जोरावर फडणवीसांनी नियोजन केलं. त्यामुळे सत्ता असतानाही मविआचे दोन उमेदवार पराभूत झाले. आता शरद पवार रिंगणात नसतील तर हाच खेळ महायुतीकडून पुन्हा खेळला जाऊ शकतो. तसं झाल्यास ती काँग्रेस, ठाकरेसेनेसाठी मोठी नामुष्की असेल.

# बुलढाणा ग्रंथोत्सवाची उत्साहात सांगता; दोन दिवसांत ३ लाखांहून अधिक ग्रंथांची विक्री

जनसंचलन/बुलढाणा

स्थानिक गर्दे वाचनालयाच्या सभागृहात आयोजित दोन दिवसीय ग्रंथोत्सव २०२५ चा मोठ्या उत्साहात समारोप झाला. वाचन संस्कृती जोपासण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, राज्य ग्रंथालय संचालनालय आणि जिल्हा ग्रंथालयाधिकारी कार्यालयामार्फत या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रंथदिंडीने सुरू झालेल्या या सोहळ्याला जिल्ह्यातील ग्रंथप्रेमींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ग्रंथोउत्सवामध्ये विविध वैचारिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी रसिकांना परिसंवाद व कविसंमेलन च्या माध्यमातून मिळाली. पहिल्या सत्रात ङ्गवाचन संस्कृती: काल, आज आणि उद्याफ या विषयावर परिसंवाद पार पडला. प्रा. कमलेश खिल्लारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या चर्चेत नेमिनाथ सातपुते, सुनील वायाळ, डॉ. राजेंद्र गणगे, देविदास समुद्रवार आणि रफिक कुरेशी यांच्यासह अनेक मान्यवरांनी सहभाग नोंदवला. संदीप चव्हाण यांनी या सत्राचे सूत्रसंचालन केले. दुपारच्या सत्रात सुभाष किन्होळकर यांच्या अध्यक्षतेखाली रंगलेल्या कविसंमेलनाने रसिक मंत्रमुग्ध झाले. गोविंद गायकी, सर्जेराव चव्हाण, राजेंद्र काळे, रमेश आराख आणि वैशाली तायडे यांसारख्या कवींनी आपल्या बहारदार कविता व गझल सादर केल्या. ग्रंथप्रेमींचा उदंड प्रतिसाद: या दोन दिवसीय महोत्सवात केवळ चर्चासत्रेच नाही, तर पुस्तक खरेदीलाही मोठा प्रतिसाद मिळाला. बुलढाणेकर ग्रंथप्रेमींनी यावर्षी ३ लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या ग्रंथांची खरेदी केली, जे वाढत्या वाचन संस्कृतीचे सकारात्मक लक्षण मानले जात आहे. या महोत्सवासाठी जिल्ह्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचे पदाधिकारी, कर्मचारी, साहित्यिक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी व वाचक उपस्थित होते.



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# रेरा रद्द करण्यात कोणाचे हित ?

ङ्गरेरा ही संस्था दिवाळखोर होणाऱ्या बांधकाम व्यवसायिकांना मदत करण्याशिवाय काहीही करत नाही. ज्यांच्यासाठी रेराची स्थापना केली त्यांना कोणताही दिलासा मिळत नाही. त्यामुळे रेरा कायदाच रद्द करावा,फ अशा कठोर शब्दात भारताचे सरन्यायाधीशच व्यक्त झाल्यामुळे रेरा कायद्यातील उणीवा आणि रेरा कायद्याच्या सहेतुक ढिसाळ अंमलबजावणीचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. रेरा कायदा भारतात पूर्णांशाने एक मे २०१७ पासून अंमलात आला. ५०० चौरस मीटर क्षेत्रफळाहून जास्त किंवा आठपेक्षा जास्त सदनिका असलेला प्रत्येक गृहप्रकल्प रेरा कायद्याअंतर्गत राज्य रेरा प्राधिकरणाकडे (महाराष्ट्रात महारेराकडे) नोंदणीकृत होण्याचे बंधन घालण्यात आले. ही नोंदणी करताना इमारतीचा नकाशा, संबंधित बांधकाम परवानगीचा दाखला आणि नियोजित गृह प्रकल्पाची संपूर्ण माहिती देणे, तसेच सदनिकांचा ताबा केव्हा देणार हे शपथपत्रावर देणे विकासकांना अनिवार्य करण्यात आले. ग्राहकांकडून मिळणाऱ्या रकमेतील ७० टक्के रक्कम स्वतंत्र बँक खात्यात जमा करण्याचे बंधन आणि त्यातून बांधकाम प्रगतीनुसार रकमा काढण्यावर रेरा प्राधिकरणाची देखरेख या कायदेशीर तरतुदींमुळे घर खरेदीदार बराचसा सुरक्षित झाला. तसेच एकूण सदनिकांच्या पैकी ५१ % सदनिकांची विक्री होताच तीन महिन्यात विकासकाने सदनिकाधारकांची सहकारी संस्था स्थापन करणे, ताबा प्रमाणपत्र मिळाल्यानंतर तीन महिन्याच्या आत इमारतीचे सहकारी संस्थेच्या नावे हस्तांतरण करणे अशी बंधनेसुद्धा रेरा कायद्यात घालण्यात आली. नोंदणी झालेल्या प्रत्येक गृह प्रकल्पाची संपूर्ण माहिती रेराच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याची तरतूदही रेरा कायद्यात करण्यात आली. अशी रीतसर नोंदणी होण्यापूर्वी सदनिका विक्रीवर आणि त्या संबंधित जाहिरातींवर बंदी घालण्यात आली. ग्राहकाशी विक्री करारनामा केल्याशिवाय मूळ किंमतीच्या दहा टक्क्यांहून अधिक रक्कम घेण्यास मज्जाव करण्यात आला. ताबा देण्यास विलंब होत असेल तर विलंब काळासाठी विकासकाने घर खरेदीदाराला एकूण भरलेल्या रकमेवर ठराविक दराने दरमहा व्याज देण्याचे बंधनही कलम १८ द्वारे घालण्यात आले. इतकेच नव्हे तर विलंब झाल्याने ज्या ग्राहकांना नोंदणी रद्द करायची असेल त्यांना त्यांची संपूर्ण रक्कम ठराविक व्याजाने ३० दिवसांच्या आत परत करण्याचे बंधनही विकासकांवर घालण्यात आले. ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी ६० दिवसांची कालमर्यादा रेरा कायद्याने निश्चित करून बाधित ग्राहकांना जलद दिलासा देण्याची तरतूदही करण्यात आली. ग्राहकाला परतावा आणि व्याज देण्याबाबतच्या आदेशाला विकासकाला अपिलाद्वारे आव्हान करायचे असल्यास अपील प्राधिकरणापुढे ही संपूर्ण रक्कम प्रथम जमा करण्याची ग्राहकाभिमुख तरतूदही रेरा कायद्यात करण्यात आली, जेणेकरून विकासक नाहक अपील मागून अपील करत ग्राहकाला नाडणार नाही. या पार्श्वभूमीवर रेरामुळे फक्त विकासकांचाच फायदा झाला हे सरन्यायाधीशांचे म्हणणे तितकेसे बरोबर नाही. रेरामुळे यापूर्वी कधी नव्हती इतकी पारदर्शकता या क्षेत्रात आली हे मान्य करावेच लागेल. त्याचबरोबर विकासकांचे ग्राहकांपरती उत्तरदायित्व स्थापित झाले आहे. अशा परिस्थितीत इतक्या अनेक ग्राहकाभिमुख तरतुदी असलेला रेरा कायदा त्याच्या ढिसाळ किंवा सहेतूक निष्क्रिय अंमलबजावणीमुळे रद्द करावा का? तर त्याचे उत्तर ङ्गनाहीफ असेच आहे. कोणताही कायदा हा परिपूर्ण असूच शकत नाही. त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाल्यावर या कायद्यातील काही त्रुटी अथवा उणिवा ध्यानात येतात. त्यावर उपाय म्हणजे वेळोवेळी या कायद्यात अनुषंगिक सुधारणा करणे. कायदा कितीही चांगला असला तरी त्याची उपयुक्तता आणि प्रभाव हा त्याच्या अंमलबजावणीवरच अवलंबून असतो. येत्या १ मे रोजी रेरा कायदा अंमलात येऊन नऊ वर्षे पूर्ण होतील. या दरम्यान या कायद्यात कोणत्या उणीवा लक्षात आल्या ते बघणे उचित ठरेल.

पुनर्विकासातील जुन्या रहिवाशांना दिलासा हवा : रेरा कायद्यात याबद्दल असलेल्या तरतूदीचा योग्य अर्थ महारेरा प्राधिकरणाने न लावल्याने राज्यातील हजारो पुनर्विकास प्रकल्पातील लक्षावधी जुन्या रहिवाशांना रेरा कायद्याचा लाभ मिळू शकला नाही. त्यामुळे रेरा कायद्यात यासंबंधी सुस्पष्टता आणण्यासाठी आवश्यक ती दुरुस्ती करणे गरजेचे आहे. दिल्ली येथे नुकत्याच पार पडलेल्या एका रियल इस्टेट परिषदेत मुंबई ग्राहक पंचायतीतर्फे हा प्रश्न उपस्थित करण्यात आला. सुदैवाने विकासकांच्या संघटना, अनेक राज्यातील रेरा अध्यक्ष इतकेच नव्हे तर खुद्द केंद्रीय गृहनिर्माण मंत्री मनहरलाल खट्टर यांनी याबाबतीत अनुकूलता दर्शवल्याने पुनर्विकासातील जुन्या रहिवाशांना लवकरच रेराअंतर्गत दिलासा मिळण्याची दाट आशा आहे. रेरा कायद्यातील कलम ३(२)अ अंतर्गत तरतुदीचा कायद्याला अभिप्रेत असा अर्थ न लावल्याने राज्यात आणि विशेषतः मुंबईत ५०० चौ. मीटर्सहून कमी क्षेत्रफळाच्या भूखंडावर आज चक्क २०० ते २५० सदनिका असलेले वीस ते तीस मजली टॉवर्सचे मोठमोठे गृहनिर्माण प्रकल्प रेरा कायद्यातून वगळून अनेक मोठ्या बिल्डर्सना महारेराने अभय दिले आहे. हा मुद्दा सुद्धा मुंबई ग्राहक पंचायतीतर्फे दिल्लीतील परिषदेत मांडण्यात आला आणि त्यावरही माननीय मंत्री महोदयांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. एखाद्या विकासकाने रेरा प्राधिकरणाचे अथवा न्यायिक अधिकाऱ्याचे आदेश अंमलात आणण्यास टाळाटाळ केल्यास वा नकार दिल्यास रेरा कायद्यामध्ये फक्त आर्थिक दंडात्मक कारवाईची तरतूद आहे. याउलट ग्राहक संरक्षण कायद्यात अशा चुकार विकासकाला तीन वर्षापर्यंत तुरुंगवासाच्या शिक्षेचीही तरतूद आहे. अशीच तरतूद रेरा कायद्यात सुद्धा करणे गरजेचे आहे. रेरा कलम ४१ अन्वये केंद्रीय सल्लागार परिषद स्थापन करण्याची तरतूद आहे. त्याच धर्तीवर राज्य स्तरावरही सल्लागार परिषद स्थापन करण्याची दुरुस्ती मुंबई ग्राहक पंचायतीने प्रस्तावित केली आहे. रेरा प्राधिकरणाकडून कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी प्रत्येक राज्यात एक ङ्गउच्चाधिकार देखरेख यंत्रणाफ निर्माण केल्यास रेरा प्राधिकरणांवर वचक राहून त्यांच्या कामातील दिरंगाई आणि बिल्डर धार्जिण्या कृतींना आळा बसू शकेल. आज रेरा कायद्यात राज्य रेरा प्राधिकरणांना कोणतेच उत्तरदायित्व नसल्याने असंख्य घर खरेदीदार ग्राहक हे रेरा कायद्याने दिलेले लाभ मिळण्यापासून वंचित आहेत.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# भाजपकडून कोणाची वर्णी? स्पर्धेत अनेक माजी आमदार, खासदार; कोअर कमिटीकडून यादी तयार

**मुंबई/नवी दिल्ली :** राज्यसभेच्या ७ जागांसाठी १६ मार्चला मतदान होणार आहे. त्यासाठी ५ मार्चपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करायचे आहेत. महायुतीकडे असलेलं संख्याबळ पाहता ७ पैकी ६ जागा सत्ताधाऱ्यांच्या वाट्याला येतील. यातील ४ जागा भाजपला मिळणार आहेत. या ४ जागांसाठी इच्छुकांची संख्या मोठी आहे. भाजपच्या कोअर कमिटीनं संभाव्य २५ नावांची यादी तयार केली आहे. ही यादी केंद्रीय भाजपकडे पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.केंद्रीय मंत्री रामदास आठवले, धैर्यशील पाटील आणि भागवत कराड यांच्या राज्यसभेचा कार्यकाळ २ एप्रिलला संपणार आहे. भाजप च्या संख्याबळाचा विचार करता त्यांचे ३ उमेदवार विजयी होऊ शकतात. मिक्षपक्षांच्या मदतीनं भाजपचा चौथा उमेदवार विजयी होऊ शकतो. या ४ जागांसाठी भाजपच्या प्रदेश कोअर कमिटीनं २५ नावांची यादी तयारी केली आहे. या नावांमधून भाजप नेतृत्त्व कोणाची निवड करणार, याकडे राजकीय वर्तुळाचं लक्ष लागलं आहे. या यादीत अनेक माजी मंत्री, माजी आमदार, खासदार यांची नावं आहेत.भाजपच्या यादीत राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे , माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, डॉ. भागवत कराड, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, माजी आमदार कुणाल पाटील, माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार, माजी राज्यमंत्री दिलीप कांबळे, माजी खासदार अमर साबळे, माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, माजी खासदार प्रीतम मुंडे, माधव भांडारी यांची नावं आहेत.केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले भाजपच्या कोट्यातून राज्यसभेवर आहेत. त्यांचा कार्यकाळदेखील एप्रिलमध्ये संपणार आहे. भाजपच्या वाट्याला आलेल्या चारपैकी एका जागेवर आठवले यांना संधी मिळेल, अशी शक्यता आहे. पण मित्रपक्षाच्या नेत्याच्या नावाची शिफारस करणं हा विषय प्रदेश कोअर कमिटीच्या अखत्यारित येत नाही. त्यामुळे याबद्दलचा निर्णय भाजपचं केंद्रीय नेतृत्व घेईल.





भाजपच्या कोअर कमिटीच्या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, रावसाहेब दानवे, चंद्रशेखर बावनकुळे, सुधीर मुनगंटीवार, पंकजा मुंडे, गिरीश महाजन, अतुल सावे, आशिष शेलार, अमित साटम उपस्थित होते.

## 'वारसा शेवटपर्यंत जपणार' ; सुनेत्रा पवारांचं निवडीनंतर पहिलं भाषण

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची धुरा आज सुनेत्रा पवार यांनी अधिकृतपणे स्वीकारली. पक्षाच्या राष्ट्रीय अधिवेशनात त्यांची या पदावर एकमताने निवड करण्यात आली. अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेताना सुनेत्रा पवार अत्यंत भावूक झाल्या होत्या. 'अजितदादांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणारी नाही, पण त्यांनी दिलेला विचारांचा वारसा आणि विकासाचा मार्ग मी शेवटपर्यंत जपेल,' असा शब्द त्यांनी यावेळी कार्यकर्त्यांना दिला.भाषणाच्या सुरुवातीलाच सुनेत्रा पवार यांनी महापुरुषांना अभिवादन करत पक्षाच्या नेत्यांचे आणि कार्यकर्त्यांचे आभार मानले. त्या म्हणाल्या, 'माझ्यावर जो विश्वास तुम्ही टाकला आहे, तो म झ्यासाठी केवळ एक पद नाही, तर लाखो कार्यकर्त्यांच्या आशा-आकांक्षा आणि संघर्षाची जबाबदारी आहे. हा सन्मान माझा नसून तळागाळात काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याचा, माता-भगिनींचा आणि जनमानसाचा आहे.'अजित पवारांच्या आठवणींना उजाळा देताना सुनेत्रा पवार यांना आपला हुंदका आवरता आला नाही. 'आदरणीय दादा आज आपल्यात नाहीत, हे मन मानायला तयार नाही. त्यांचा मृत्यू हा एक मोठा आघात आहे.



३० जून २०२३ रोजी त्यांनी अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली होती. अवघ्या अडीच वर्षांच्या काळात त्यांनी महाराष्ट्र पिंजून काढला आणि पक्षाची ताकत तिपटीने वाढवली. त्यांचे स्वप्न अर्धवट राहिले असले तरी, आपण सर्वांनी मिळून ते पूर्णत्वास नेऊ,' असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.पक्षाच्या भविष्यातील वाटचालीवर भाष्य करताना त्यांनी स्पष्ट केले की, 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा केवळ एक राजकीय पक्ष नसून तो एक विचार आणि समृद्धीचा परिवार आहे. ग्रामीण भागात आपली पाळेमुळे घट्ट आहेतच, पण आता शहरी भागातही जनतेचा विश्वास संपादन करायचा आहे. तरुण कार्यकर्त्यांना बळ देऊन आणि महिला सक्षमीकरणावर भर देऊन आपल्याला पुन्हा एकदा पक्षाला 'राष्ट्रीय पक्षाचा' दर्जा मिळवून द्यायचा आहेशेतकरी हा पक्षाचा कणा असल्याचे सांगत त्यांनी अजित पवारांच्या 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (अख) धोरणाचा उल्लेख केला.

## पार्थ पवारांसंदर्भात NCP ची मोठी घोषणा

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अधिवेशनात सुनेत्रा पवार यांची पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड करण्यात आली. सुनेत्रा पवार यांची निवड एकमुखानं करण्यात आली. याबद्दलची घोषणा पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल पटेल यांनी केली. पटेल यांनीच पार्थ पवार यांच्या नावाची घोषणा राज्यसभेचे उमेदवार म्हणून केली. पार्थ पवार राज्यसभेवर जाणार असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरु होती.

राज्यसभेच्या ७ जागांसाठी १६ मार्चला मतदान होणार आहे. त्यासाठी ५ मार्चपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करावे लागणार आहेत. महायुतीचं संख्याबळ पाहता ७ पैकी ६ जागा सत्ताधाऱ्यांना जिंकता येतील. यातील ४ जागांवर भाजप उमेदवार देणार आहे. तर शिंदेसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला प्रत्येकी १ जागा मिळेल. भाजप आणि शिंदेसेनेनं अद्याप तरी त्यांचे उमेदवार जाहीर केलेले नाहीत. पण राष्ट्रवादी काँग्रेसनं पार्थ पवार यांची उमेदवारी जाहीर केली आहे.दुसरीकडे पार्थ पवार यांचे आजोबा, राष्ट्रवादी काँग्रेस शपचे अध्यक्ष शरद पवारदेखील राज्यसभेवर जाण्यासाठी प्रयत्नशील आहेत. पण त्यांच्या पक्षाकडे आवश्यक संख्याबळ नाही. राष्ट्रवादी शपकडे केवळ १० आमदारांचं बळ आहे.

## 'गोळा केलेले पुरावे सुपूर्द केले' रोहित पवारांनी दिली महत्त्वाची माहिती

**पुणे :** सीआयडी कार्यालयात भेट दिल्यानंतर आमदार रोहित पवार यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, 'डीजीसीएने डी जी सी ए या विमान अपघातासाठी 'व्हीएसआर' (व्हीएसआर) कंपनीला जबाबदार धरले आहे. जेव्हा २४ फेब्रुवारीला हा अहवाल समोर आला, तेव्हा मी स्वतः मुंबईला जाऊन गुन्हा दाखल करण्याची विनंती केली होती. मात्र, तिथे आमचा एफआयआर (एफआयआर) नोंदवून घेण्यात आला नाही.'रोहित पवार पुढे म्हणाले, 'आज मी बारामतीला गेलो होतो. तिथेही तीन तास आणि मुंबईतही तीन तास बसून राहिलो, तरीदेखील आमचा एफआयआर घेतला गेला नाही. खरंतर एफआयआर दाखल करून घेणे हा आमचा अधिकार आहे. आम्हाला सांगण्यात आले की, अजितदादांचा अपघात झाला आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला, त्यामुळे 'अकस्मात मृत्यू'ची ( ए डी आर ) नोंद करून पुढील तपास सुरू आहे. मात्र, आमचे म्हणणे असे आहे की, डीजीसीएने कंपनीला जबाबदार धरले असतानाही आजपर्यंत एकही एफआयआर का दाखल झाला नाही?'आम्हाला सांगण्यात आले की, तपास सीआयडी करत आहे, त्यामुळे पोलीस एफआयआर घेऊ शकत नाहीत.



परंतु असा कोणताही नियम नाही. अकस्मात मृत्यूच्या नोंदीनंतरही एफआयआर करता येतो, असा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आहे. आम्ही दोन महत्त्वाच्या निकालांचा अभ्यास करून एफआयआर करण्याचा प्रयत्न केला, पण यश आले नाही. पोलीस सहकार्य करत नसल्यामुळेच आम्ही आज सीआयडीच्या प्रमुखांची भेट घेण्याचे ठरवले,' असेही त्यांनी स्पष्ट केले.सीआयडीच्या पत्रकार परिषदेवर भाष्य करताना रोहित पवार म्हणाले, 'आम्ही भेट घेण्यापूर्वी सीआयडीने पत्रकार परिषद घेतली. लोकांचा दबाव पाहून २७ दिवसांनंतर का असेना त्यांनी ही प्रेस घेतली, ही चांगली गोष्ट आहे. सीआयडीचे प्रमुख अधिकारी आणि दोन्ही एसपी चांगल्या प्रतिमेचे आहेत. परंतु, या प्रेसमध्ये त्यांनी पत्रकारांना ठोस माहिती दिली नाही. 'तपास सुरू आहे' एवढेच त्यांनी सांगितले.

## माजी आमदाराचा काँग्रेसला रामराम, फडणवीसांची भेट, भाजपचा झेंडा धरणार

**चंद्रपूर :** काँग्रेसमधील गटबाजीला कंटाळून चिमूरचे माजी आमदार डॉ. अविनाश वारजूरकर व माजी जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ. सतीश वारजूरकर हे आज, गुरुवारी भाजपमध्ये प्रवेश घेणार आहेत. वारजूरकर बंधूच्या हा पक्षबदल काँग्रेससाठी चिमूरमध्ये मोठा धक्का मानला जात आहे.काँग्रेसचे माजी आमदार डॉ. अविनाश वारजूरकर व त्यांचे बंधू डॉ. सतीश वारजूरकर मागील काही दिवसांपासून अस्वस्थ होते. डॉ. सतीश वारजूरकर हे २०१९ व २०२४ अशा सलग दोन निवडणुकीत चिमूर विधानसभा म तदारसंघातून काँग्रेसचे उमेदवार राहिले होते. पण, यात त्यांना पराभवाचे तोंड बघावे लागले होते. काँग्रेस पक्षातील गटबाजीमुळेच आपला पराभव झाल्याचा आरोपही त्यांनी केला होता. चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत काँग्रेसचा पराभव झाला.



त्यापाठोपाठ सत्तेच्या जवळ असताना काँग्रेसने केवळ गटबाजीमुळे महापालिकेतील सत्ता गमावली. आता चंद्रपूर जिल्हा परिषद निवडणुकीत तेच होणार असे स्पष्ट करीत काँग्रेस पक्षातील अंतर्गत गटबाजीने त्रस्त होत भाजपात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला असल्याचे, डॉ. सतीश वारजूरकर यांनी 'मटा'शी बोलताना सांगितले.वारजूरकर बंधूंनी बुधवारी मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी भाजपचे आमदार बंटी भांगडिया उपस्थित होते. ते गुरुवारी भाजपच्या मुंबई कार्यालयात अधिकृत पक्ष प्रवेश घेणार असल्याची पुष्टी डॉ. सतीश वारजूरकर यांनी जोडली.चारच दिवसांपूर्वी, रविवारी आसाम काँग्रेसचे माजी प्रमुख भूपेनकुमार बोरा यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष दिलीप सैकिया यांच्या उपस्थितीत सत्ताधारी भाजपमध्ये प्रवेश केला. पक्षप्रवेशानंतर काही तासांतच भाजपने बोरा यांना राज्य कार्यकारिणीवर स्थान दिले. आसाम भाजपचे मुख्यालय असलेल्या 'वाजपेयी भवन' येथे झालेल्या कार्यक्रमात बोरा यांनी भाजप प्रवेश केला. त्यांच्यासोबत माजी काँग्रेस नेते संजू बोरा, राजेशकुमार जोशी, कंगन दास, गगनचंद्र बोरा आणि विरोधी पक्षातील डझनभराहून अधिक कार्यकर्तेही भाजपमध्ये सामील झाले.बोरा यांनी १६ फेब्रुवारीला राजीनामा दिला होता, परंतु काँग्रेस हायकमांडने तो स्वीकारला नव्हता. त्यानंतर वरिष्ठ काँग्रेस नेते त्यांच्या निवासस्थानी गेले होते, तर राहुल गांधी यांनीही त्यांच्याशी संपर्क साधला होता. आपल्या निर्णयावर पुनर्विचार करण्यासाठी त्यांनी अवधी मागितला होता; परंतु , त्यांनी भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची घोषणा केली होती.आसाम विधानसभेची मार्च-एप्रिलमध्ये निवडणूक होण्याची अपेक्षा आहे.

या पार्श्वभूमीवर काँग्रेससाठी हा धक्का मानला जात आहे. 'मी भाजपमध्ये प्रवेश करण्यासाठी पक्षाचा राजीनामा दिला नव्हता. बिघडलेल्या गोष्टींबाबत मंथन, आत्मपरीक्षण होईल, अशी अपेक्षा होती. नेतृत्वाने मात्र मला दुखावले', असे ते म्हणाले.

# अंगण झाडणाऱ्या महिलेला मोकाट वळूने उडवलं, घरासमोरच प्रकार, नागपूरकरांवर भीतीचं सावट





**नागपूर :** नागपुरात मोकाट जनावरांचा वाढता वावर नागरिकांसाठी धोकादायक ठरत आहे. नागपूरच्या सन्मान नगर परिसरात घडलेल्या घटनेने हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. घरासमोर झाडू मारत असताना अचानक एका मोकाट वळूने ६४ वर्षीय महिलेवर भीषण हल्ला केल्याने परिसरात भीतीचे वातावरण निम ण झाले आहे. या घटनेमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा मुद्दा गंभीरपणे समोर आला आहे.माहितीनुसार, वंदना देवीकर (वय ६४) या २७ जानेवारी रोजी सकाळी साडेसात वाजताच्या सुमारास सन्मान नगर येथील आपल्या घरासमोर स्वच्छता करत होत्या. त्याच वेळी रस्त्यावर मोकाट फिरणारा एक वळू अचानक त्यांच्या दिशेने धावत आला. काही समजण्याआधीच वळूने त्यांना जोरदार धडक देत जमिनीवर आपटले आणि शिंगांनी तुडवत गंभीर जखमी केले. हल्ला इतका अचानक आणि भीषण होता की शेजाऱ्यांना म दतीला धाव घेण्याची संधीही मिळाली नाही.आरडाओरड ऐकून परिसरातील नागरिकांनी तत्काळ धाव घेत वळूला हुसकावून लावले आणि गंभीर जखमी अवस्थेत देवीकर यांना जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल केले. तपासणीत त्यांच्या बरगड्या व हात-पायांतील हाडे मोडल्याचे स्पष्ट झाले. डोक्याला जबर मार लागल्याने मेंदूला गंभीर दुखापत झाली आहे. त्यांच्यावर तातडीने शस्त्रक्रिया करण्यात आली असून त्या जवळपास तीन आठवडे अतिदक्षता विभागात मृत्यूशी झुंज देत होत्या. सध्या त्या घरीच उपचार घेत असून कृत्रिम ऑक्सिजनच्या सहाय्याने त्यांची प्रकृती स्थिर ठेवण्याचा प्रयत्न सुरू आहे.दरम्यान, हल्ला करणारा वळू अद्याप त्याच परिसरात मोकाट फिरत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण असून लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिला घराबाहेर पडताना घाबरत आहेत. नागरिकांनी महानगरपालिकेच्या जनावर पकडणाऱ्या पथकाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.शहरातील विविध भागांत मोकाट जनावरांचा त्रास वाढत असल्याच्या तक्रारी सातत्याने सम ोर येत आहेत. रस्त्यांवरील वाहतुकीला अडथळा, अपघातांचा धोका आणि अशा प्रकारचे जीवघेणे हल्ले यामुळे नागरिकांची सुरक्षा धोक्यात आली आहे. मात्र, प्रतिबंधात्मक कारवाई आणि जनावरांच्या कायमस्वरूपी बंदोबस्ताबाबत ठोस उपाययोजना होत नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे. वंदना देवीकर यांच्यावर झालेला हा हल्ला केवळ एक अपघात नसून शहरातील मोकाट जनावरांच्या समस्येचे गंभीर चित्र आहे. प्रशासनाने तातडीने पावले उचलून नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे.

## तरुणाच्या डोक्यात कोयत्याने वार केला




**पुणे :** माझ्या मैत्रिणीशी का बोलतोस?ङ्क असा जाब विचारत चार जणांच्या टोळक्याने एका २१ वर्षीय तरुणाला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून कोयत्याने डोक्यात व हातावर वार करत गंभीर जखमी केल्याची घटना कोथरुड येथील पौड फाटा परिसरात घडली. हा प्रकार २४ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री दोनच्या सुमारास मेगासिटीकडे जाणाऱ्या रस्त्यावर उघडकीस आला.या प्रकरणी चिन्मय चंद्रकांत भोसले (वय २१, रा. विश्वशांती चौक, केळेवाडी, पौड रोड) यांनी कोथरुड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी अमित कांबळे (वय २३, गोखलेनगर), अंकुश पवार (वय १९, गोखलेनगर), अनुष्का पवार (वय १९, नवी सांगवी) आणि रिक्षीका वेलाग लेटी (वय १८, सुस गाव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी चिन्मय भोसले वाकडेवाडी येथे नोकरी करतात. १९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी पत्रकारनगर येथे असताना अंकुश पवार याने ङ्कमाझ्या मैत्रिणीशी का बोलतोस?ङ्क असा जाब विचारत त्यांच्याशी वाद घातला होता. ओळखीचे असल्याने त्यावेळी भोसले यांनी तक्रार केली नव्हती२४ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री दोनच्या सुमारास भोसले हे सम्यक संदीप गाडेकर (वय १८, गोखलेनगर) याच्यासोबत मेगासिटीकडे जाणाऱ्या रस्त्यावर उभे होते. त्यावेळी तीन वाहनांवरून आरोपी तेथे आले. अमित कांबळे याने भोसले यांच्या गळ्यात हात टाकून ङ्कसाईडला ये, बोलायचे आहे,ङ्क असे म्हणत त्यांना बाजूला नेण्याचा प्रयत्न केला. मात्र भोसले यांनी नकार दिल्यानंतर आरोपींनी शिवीगाळ सुरू केली.यानंतर चौघांनी मिळून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. अंकुश पवार याने हातातील लोखंडी कोयत्याने वार करण्यासाठी धाव घेतली. स्वतःचा बचाव करण्यासाठी भोसले यांनी उजवा हात पुढे केला असता त्यांच्या बोटाला वार बसला. त्यानंतर खाली वाकलेल्या अवस्थेत त्यांच्या डोक्यात दुसरा वार करण्यात आला.भोसले यांना वाचविण्यासाठी सम्यक गाडेकर पुढे सरसावला असता त्यालाही मारहाण करण्यात आली. भोसले यांच्या डोक्यातून व हातातून रक्तस्राव होत असल्याचे पाहून आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.

## सातवीतील मुलीवर फार्महाऊसमध्ये अत्याचार

**पुणे :** तेरा वर्षांच्या मुलीवर अत्याचार करून तिला गर्भवती करणाऱ्या काम गाराला पुण्याच्या विशेष न्यायालयाने वीस वर्षे सक्तमजुरी आणि अकरा हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. पीडिता व तिच्या आईने दिलेली साक्ष आणि डीएनए चाचणीत आरोपी हाच अर्भकाचा जैविक पिता असल्याचे सरकार पक्षाने सिद्ध केल्यानंतर विशेष न्यायाधीश सुचेता टाकळीकर यांनी हा निकाल दिला.बजरंग रामचंद्र खोपडे (वय ३५, रा. तेलवडी, भोर) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याविरोधात पीडित मुलीच्या आईने राजगड पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. ही घटना नोव्हेंबर २०१८ मध्ये राजगड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका ॲग्रो टुरिझम फार्मवर घडली होतीत्या वेळी पीडित मुलगी सातव्या इयत्तेत शिकत होती. तिची आई फार्मवर स्वयंपाकाचे काम करीत असे. दिवाळीनिमित्त घरी पाहुणे आले असल्याने, पीडित मुलगी आईला बोलविण्यासाठी फार्मवर गेली. त्या वेळी आरोपीने पीडित मुलीला जबरदस्तीने खोलीत नेऊन तिच्यावर अत्याचार केले. आरोपीने पीडितेला या प्रकाराची वाच्यता केल्यास जीवे मारण्याची धमकी दिली.

## पंक्चर काढणाऱ्या टेम्पोला कारची धडक






**पुणे :** पुण्याकडे जाणाऱ्या लेनवर रस्त्याच्या कडेला पंक्चर काढण्यासाठी उभ्या असलेल्या आयशर टेम्पोला पाठीम ागून इको कारची जोरदार धडक बसून झालेल्या भीषण अपघातात दोन महिला आणि एका चिमुकल्याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेत तिघे जखमी झाले. हा अपघात पुणे-सोलापूर राष्ट्रीय महाम ार्गावरील डाळज नं. २ (ता. इंदापूर) येथे गुरुवारी (दि. २६) सायंकाळी पाचच्या सुमारास घडला.या अपघातात अदिती अमर हातेकर (वय २५) आणि त्यांच्या मुलगा जय अमर हातेकर (वय दोन) आणि सखूबाई ईश्वर गेजगे (वय ६०, सर्व रा. सांगोला, जि. सोलापूर) हे अपघातात जागीच ठार झाले.इको गाडीवरील चालक कबीरदास ईश्वर गेजगे (५०, रा. पाटस, ता. दौंड) हे गंभीर जखमी झाले. त्यांची पत्नी स्वाती गेजगे (३४) आणि मुलगी समृद्धी गेजगे (१० महिने) किरकोळ जखमी झाल्या. रात्री उशिरापर्यंत भिगवण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. महामार्गावरील नादुरुस्त मालवाहतूक वाहने तत्काळ हटवण्याची मागणी या निमित्ताने होत आहे. अपघाताबाबत सहायक पोलिस निरीक्षक विनोद महांगडे यांनी माहिती दिली. टायर पंक्चर झालेला आयशर टेम्पो धोकादायक स्थितीत महामार्गाच्या बाजूला उभा होता. त्या वेळी इको कारच्या चालकाने आयशर टेम्पोला पाठीमागून धडक दिली. त्यामुळे हा अपघात झाला. या अपघातात इको गाडीचे प्रचंड नुकसान झाले. भिगवण पोलिसांनी जखमींना गाडीतून बाहेर काढण्यास मदत केली. अपघातात कारचा अक्षरशः चुराडा झाला होता.

# ३२ वर्षीय सख्ख्या मामीसोबत किळसवाणं कृत्य, भाच्याला अटक



**नागपूर :** नातेसंबंधांना काळिमा फासणारी धक्कादायक घटना नागपुरातील यशोधरा नगर परिसरात उघडकीस आली आहे. आपल्याच सख्ख्या मामीसोबत आक्षेपार्ह कृत्य करून तिचा विनयभंग केल्याप्रकरणी यशोधरा नगर पोलिसांनी ३० वर्षीय तरुणाला अटक केली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.मिळालेल्या माहितीनुसार, ३२ वर्षीय पीडित महिला यशोधरा नगर भागात आपल्या पती व कुटुंबासह राहते. आरोपी हा नात्याने तिचा भाचा असून काही दिवसांपासून तो त्यांच्या घरी ये-जा करत होता. विश्वासाच्या नात्याचा गैरफायदा घेत त्याने महिलेचा विनयभंग केल्याचा आरोप आहे.पहिल्यांदा १५ फ ब्रुवारी रोजी दुपारच्या सुमारास हा प्रकार घडला. महिला आपल्या बेडरूममधील कपाटातून मुलाचे कपडे काढत होती. त्यावेळी आरोपी बेडवर झोपल्याचे भासवत होता. महिला कपडे घेऊन बाहेर पडत असताना आरोपीने अचानक तिला मागून पकडण्याचा प्रयत्न केला. या अनपेक्षित प्रकारामुळे महिला घाबरली व तिने आरोपीला जाब विचारला. मात्र आरोपीने कोणतेही उत्तर न देता तेथून पळ काढला. त्यावेळी कुटुंबातील इतर सदस्य घरात नसल्याने महिला घाबरली होती; तरीही नातेसंबंधांमुळे तिने तो प्रसंग दुर्लक्षित केल्याचे सांगितले जाते.यानंतर २४ फेब्रुवारी रोजी सकाळच्या सुमारास पुन्हा महिला घरात एकटी असताना समोरच्या खोलीचा दरवाजा लावत होती. त्याच वेळी बेडरूममध्ये दबा धरून बसलेल्या आरोपीने पुन्हा तिच्या पाठीमागून येत आक्षेपार्ह चाळे केले. या प्रकारामुळे महिला घाबरली, मात्र तिने धैर्य दाखवत आरोपीला जोरात धक्का दिला आणि स्वतःची सुटका करून घेतली. या घटनेनंतर ती प्रचंड मानसिक तणावाखाली होती.सततच्या छळाला कंटाळून अखेर महिलेने यशोधरा नगर पोलीस ठाणे येथे धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी तक्रारीची दखल घेत तत्काळ गुन्हा नोंदवून आरोपीला अटक केली. भारतीय दंड संहितेच्या विनयभंगासंदर्भातील विविध कलमान्वये त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिलेच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवण्यात आला असून आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

# झिम्बाब्वेवर भारताची एकतर्फी मात

## सुपर -८ मध्ये भारताने गुणाचे खाते उघडले : ७२ धावांनी विजय..

**चेन्नई/वृत्तसंस्था :** येथील चेपॉक स्टेडियम वर खेळल्या गेलेल्या सामन्यात भारताने झिम्बाब्वेचा पराभव करत स्पर्धेतील आपले आव्हान कायम राखले आहे. या विजया मुळे भारताने केवळ गुणतालिकेत आपले खाते उघडले नाही, तर सेमी-फायनलच्या शर्यतीत स्वत:ला कायम ठेवले आहे. आता सर्व नजरा १ मार्चला होणाऱ्या वेस्ट इंडिजविरूद्ध महामुकाबल्यावर असतील.

अभिषेक शर्मा (५५) आणि हार्दिक पंड्या (नाबाद ५०), तिलक वर्मा (१६ चेंडूत नाबाद ४४) यांच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर टीम इंडियाने २० षटकांत चार गडी गमावून २५६ धावा केल्या. प्रत्युत्तरात, झिम्बाब्वेचा संघ निर्धारित षटकांत ६ गडी गमावून केवळ १८४ धावाच करू शकला. त्यांच्याकडून ब्रायन बेनेटने एकाकी लढत देत ९७ धावांची नाबाद खेळी केली, पण त्याला इतर फलंदाजांची अपेक्षित साथ मिळाली नाही. दरम्यान, भारताने झिम्बाब्वेला ७२ धावांनी हरवून उपांत्य फेरीच्या दिशेने एक मजबूत पाऊल टाकले आहे. विशेष म्हणजे, टीम इंडियाने टी- २० वर्ल्डकपम धील आपली सर्वोच्च धावसंख्या नोंदवली. याआधी २००७ मध्ये भारताने इंग्लंडविरुद्ध २१८ धावा केल्या होत्या.



झिम्बाब्वेने नाणेफेक जिंकून भारतीय संघाला प्रथम फलंदाजी करण्याचे आमंत्रण दिले होते. भारतीय फलंदाजांनी झिम्बाब्वेविरुद्ध आपला दम दाखवला. अभिषेक शर्माने या संधीचे सोने करताना खराब फॉर्मवर अखेर मात दिली. त्याने ३० चेंडूंत ४ चौकार व ४ षटकारांसह ५५ धावा केल्या. संजू सॅमसन (१५ चेंडूत २४), इशान किशन (२४ चेंडूत ३८) व सूर्यकुमार यादव (१३ चेंडूत ३३) यांनीही दमदार खेळी साकारत संघाच्या धावसंख्येला आकार दिला. यानंतर तिलक वर्मा व हार्दिक पंड्या या जोडीने धावांचा पाऊस पाडला आणि ३१ चेंडूंत ८४ धावांची भागीदारी करून संघाला ४ बाद २५६ धावांपर्यंत पोहोचवले. हार्दिकने शेवटच्या दोन चेंडूंवर षटकार खेचून अर्धशतक पूर्ण केले. त्याने २३ चेंडूंत २ चौकार व ४ षटकारांसह ५० धावा केल्या, तर तिलक १६ चेंडूंत ३ चौकार व ४ षटकारांसह ४४ धावांवर नाबाद राहिला.

धावांचा पाठलाग करताना झिम्बाब्वेची सुरुवात चांगली झाली, मात्र ती अपेक्षेपेक्षा संथ गतीने झाली. ब्रायन बेनेट आणि तादिवानाशे मारुमनी यांनी पहिल्या विकेटसाठी ६.२ षटकांत ४४ धावांची भागीदारी उभी केली. मात्र अक्षर पटेलने मारुमनीला २० धावांवर बाद करत ही जोडी फोडली. त्यानंतर वरुण चक्रवर्तीने डियोन मायर्सला अवघ्या ६ धावांवर म घारी धाडत झिम्बाब्वेला आणखी एक धक्का दिला. या दोन झटक्यांनंतर कर्णधार सिकंदर रझा आणि ब्रायन बेनेट यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला. दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी ७२ धावांची म हत्त्वपूर्ण भागीदारी रचली. रझाने २ षटकार आणि २ चौकारांच्या मदतीने २१ चेंडूत ३१ धावांचे योगदान दिले. ब्रायन बेनेट एकटा नडला, पण संघांचा पराभव तो टाळू शकला नाही. ब्रायन बेनेट ५८ चेंडूंत ७ चौकार व ६ षटकारांसह ९७ धावांवर नाबाद राहिला. झिम्बाब्वेला ६ बाद १८४ धावापर्यंतच मजल मारता आली.

आफ्रिकेविरूद्ध सामना गमावल्यानंतर भारतीय संघाने झिम्बाब्वेविरूद्ध मोठ्या विजयाची नोंद केली. त्यामुळे भारतीय संघाकडे सेमीफायनलमध्ये जाण्याची संधी कायम आहे. भारतीय संघाचा सुपर एट फेरीतील पुढील सामना दि. १ मार्च रोजी वेस्ट इंडिजविरूद्ध होणार आहे. हा सामना दोन्ही संघांसाठी नॉकआऊट सामना असणार आहे. जो संघ हा साम ना जिंकेल, तो सेमीफायनलमध्ये प्रवेश करणार आहे. या सामन्यात नेट रनरेट महत्त्वाचा नसेल, केवळ सामना जिंकून भारतीय संघ सेमीफायनलमध्ये आपले स्थान निश्चित करू शकतो.

### संक्षिप्त धावफलक

- **भारत :** २० षटकांत ४ बाद २५६ (संजू सॅमसन २४, अभिषेक शर्मा ३० चेंडूत ५५, इशान किशन ३८, सूर्यकुमार यादव १३ चेंडूत ३३, हार्दिक पंड्या २३ चेंडूत नाबाद ५०, तिलक वर्मा १६ चेंडूत नाबाद ४४, नगारावा, मुझाराबानी, मापोसा आणि सिकंदर रझा प्रत्येकी १ बळी)
- **झिम्बाब्वे :** २० षटकांत ६ बाद १८४ (ब्रायन बेनेट ५९ चेंडूत नाबाद ९७, मारुमनी २०, सिकंदर रझा ३१, अर्शदीप सिंग २४ धावांत ३ बळी, वरुण, अक्षर पटेल आणि शिवम दुबे प्रत्येकी १ बळी).

# दुसऱ्या विजयासह आफ्रिकन संघ सेमीफायनलच्या उंबरठ्यावर

**मुंबई/अहमदाबाद :** गुरुवारी अहम दाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर पार पडलेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने वेस्ट इंडिजचा ९ गडी राखून धुव्वा उडवला. या विजयासह दक्षिण आफ्रिकेने ४ गुणांची कमाई करत पॉइंट्स टेबलमध्ये थेट अव्वल स्थानी झेप घेतली आहे. प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिजने २० षटकांत ८ विकेट्सच्या मोबदल्यात १७६ धावा केल्या. यानंतर आफ्रिकेने १६.१ षटकांत १ विकेटच्या मोबदल्यात १७७ धावांचे लक्ष्य गाठत सेमी फायनलसाठी आपली दावेदारी भक्कम केली आहे. ४६ चेंडूत नाबाद ८२ धावांची खेळी साकारणाऱ्या मॅरक्रमला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले.

प्रारंभी, आफ्रिकेने नाणेफेक जिंकून वेस्ट इंडिजला प्रथम फलंदाजीला बोलावले. ब्रेंडन किंग आणि शाय होप यांनी आक्रमक सुरुवात केली. पण स्थिरावल्यानंतर ते दोघेही बाद झाले. ब्रेंडन किंग ११ चेंडूत २१ धावांवर आणि शाय होप ६ चेंडूत १६ धावांवर बाद झाला. त्यानंतर शिमरॉन हेटमायर (२), रोवमन पॉवेल (९), रोस्टन चेस (२), शेरफेन रुदरफोर्ड (१२), मॅथ्यू फोर्डे (११) यांनी स्वस्तात विकेट्स गमावल्या होत्या. यावेळी विंडीजने ८३ धावांवरच ७ विकेट्स गमावल्या होत्या. पण जेसन होल्डर आणि रोमारियो शेफर्ड यांनी ८ व्या विकेटसाठी ८९ धावांची विश्वविक्रमी भागीदारी केली. यामुळे वेस्ट इंडिजने २० षटकात ८ बाद १७६ धावांपर्यंत मजल मारली. जेसन होल्डरने ३१ चेंडूत ४९ धावांची खेळी केली. रोमारियो शेफर्डने ३७ चेंडूत



नाबाद ५२ धावांचे योगदान दिले. १७७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना आफ्रिकेच्या फलंदाजांनी संयम आणि आक्रमकता यांचा सुरेख मिलाफ साधला. एडन मार्करम आणि क्विंटन डिकॉक यांनी पहिल्या विकेटसाठी ९५ धावांची भक्कम भागीदारी करत संघाच्या विजयाचा पाया रचला. डिकॉकने अवघ्या २४ चेंडूमध्ये ४ षटकार आणि ४ चौकारांच्या जोरावर ४७ धावांची स्फोटक खेळी केली. मात्र रोस्टन चेज याने डिकॉकला बाद करत ही जोडी फोडली. त्यानंतर मार्करमने रिकेल्टनला सोबतीला घेत संघाला १६.१ षटकांत विजय मिळवून दिला. मार्करमने ४६ चेंडूत ७ चौकार आणि ४ षटकारासह नाबाद ८२ धावांची मोलाची खेळी साकारली. रिकेल्टनने २८ चेंडूत नाबाद ४५ धावांचे योगदान दिले.

# महिला फुटबॉल सामना बरोबरीत

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** स्वीडनच्या दौऱ्यावर गेलेल्या भारताच्या २० वर्षांखालील वयोगटाच्या महिला फुटबॉल संघाने स्वीडीश क्लबबरोबरचा मित्रत्वाचा फुटबॉल सामना १-१ असा बरोबरीत राखला. भारतीय महिला फुटबॉल संघ व स्वीडनच्या इनस्केडी आयके डॅम यांच्यातील हा मित्रत्वाचा सामना आयोजित केला होता. या लढतीमध्ये ४४ व्या मिनिटाला एन. सिबानीदेवीने भारतीय महिला संघाचे खाते उघडले. पण, ८८ व्या मिनिटाला इनस्केडी क्लबने गोल नोंदवून हा सामना बरोबरीत राखला. स्वीडनच्या दौऱ्यामध्ये भारतीय महिला फुटबॉल संघाने केवळ एकमेव सामना जिंकला आहे तर दोन सामने गमविले आहेत.



# धामणे टेनिस चॅम्पियनशिपच्या उपांत्यपूर्व फेरीत

**पुणे/वृत्तसंस्था :** येथे सुरू असलेल्या एटीपी चॅलेंजर महाराष्ट्र खुल्या ७५ दर्जाच्या पुरूषांच्या टेनिस चॅम्पियनशिप स्पर्धेत पुण्याच्या मानस धामणेने एकेरीची उपांत्यपूर्व फेरी गाठली.

सदर स्पर्धा म्हाळुंगे बालेवाडीच्या क्रीडा संकुलात खेळिवली जात आहे. या स्पर्धेत बिगर मानांकीत टेनिसपटू क्रोएशियाचा डुजे अॅड्युकोव्हीक, ब्रिटनचा अॅलीस्टर ग्रे यांनीही एकेरीची उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे. पुरूष एकेरीच्या सामन्यात भारताचा वाईल्डकार्डधारक मानस धामणेने बेलारुसच्या इलिया इव्हासिकाचा ६-३ असा पराभव केला. दुखापतीम ुळे बेलारुसच्या इव्हासिकाने स्पर्धेतून माघार घेतल्याने मानस उपांत्यपूर्व फेरीत दाखल झाला. आता त्याचा उपांत्यपूर्व फेरीचा सामना क्रोएशियाच्या अॅड्युव कोव्हीकशी होणार आहे.

बिगर मानांकीत अॅड्यूव कोव्हिकने पोर्तुगालच्या पाचव्या मानांकीत फ्रेड्रिको सिल्वाचा ६-२, ६-२, ब्रिटनच्या अॅलिस्टर ग्रेने तृतीय मानांकीत इलिया सिमाकीनचा ४-६, ७-६ (७-५), ७-५ असा पराभव करत शेवटच्या ८ खेळाडूंत स्थान मिळिवले.



इटलीच्या सहाव्या मानांकीत सिनाने जपानच्या सिमीझुचा ६-१, ६-४ असा फडशा पाडत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

# भर कार्यक्रमात अभिनेत्रींची कॅट फाईट, सोबत मुलाखतीला नकार; सुरभी रडत गेली..

**मुंबई :** हिंदी टेलिव्हिजनवरील लोकप्रिय मराठी अभिनेत्री तेजस्वी प्रकाशने नुकतेच सायको सैया या सीरिजमधून ओटीटीवर पदार्पण केले. पण ही सीरीज रिलीज होताच ती वादात आली आहे. तेजस्वी प्रकाशने तिची सह-कलाकार सुरभी चंदनासह मुलाखत देण्यास नकार दिला आणि कार्यक्रमस्थळीही ती पोहोचली नाही. नंतर असे उघड झाले की सुरभी तिथे असे पर्यंत तेजस्विनी मुलाखतीला यायला नकार दिला होता. त्यानंतर सुरभी चंदना रागाने मुलाखत देण्यासाठी बाहेर पडली, परंतु नंतर ओशाळून रडत कार्यक्रमस्थळी निघून गेली.स्क्रीन' मधील वृत्तानुसार, तेजस्वी प्रकाश , सुरभी चंदना आणि अनुद ढाका यांच्या मीडिया मुलाखती आधीच ठरलेल्या होत्या. तेजस्वी प्रकाश दोन तास उशिरा पोहोचली आणि तिने तिच्या सह-कलाकार सुरभी चंदनासोबत प्रमोशनल प्लॅटफफॉर्म शेअर करण्यास नकार दिला. नियोजित मुलाखत सुरळीत होईल असे वाटत होते, परंतु जेव्हा पत्रकार कार्यक्रम



स्थळी पोहोचले तेव्हा गोंधळ उडाला. एमएक्स प्लेअर टीमने घोषणा केली की अनुद सिंग ढाका आणि सुरभी चंदना मुलाखतीसाठी तयार आहेत, परंतु तेजस्वीच्या कपड्यांचा काहीतरी गोंधळ आहे, त्यामुळे ती थोडी उशिरा य्ईल. परंतु काही मिनिटांत येणारी तेजस्वी तासभर उलटला तरी कुठे आली नव्हती. त्यामुळे सर्व मीडिया कर्मचारी तिची वाट पाहत तातकळत राहिले पण नंतर अचानक घोषणा झाली की तेजस्वी प्रकाश कार्यक्रमाला उपस्थित राहणार नाही.थोड्याच वेळात, तेजस्वीचा पीआर कार्यक्रमस्थळी पोहोचला आणि त्याने एमएक्स प्लेअरच्या पीआरला काहीतरी सांगितले आणि माध्यमांना कळवण्यात आले की तेजस्वी सुरभी चंदनासोबत एकत्र मुलाखत देण्यास तयार नाही. स्क्रीनच्या वृत्तानुसार, सुरभी चंदना सायको सैयाच्या इंटरव्ह्यूमध्ये सहभागी होणार नाही असे आश्वासन मिळेपर्यंत तिने कार्यक्रमस्थळी येण्यास नकार दिल्याचेही बोलले गेले.याबद्दल विचारले असता, एमएक्स प्लेअर टीमने सांगितले की, 'तेजस्वी आणि तिच्या टीमला दोन दिवस आधीच कार्यक्रमाबद्दल माहिती देण्यात आली होती. तेव्हा त्यांना कोणताही आक्षेप नव्हता. शेवटच्या क्षणी ही बाब आमच्या लक्षात आणून देण्यात आली, ज्यामुळे आम्हाला काहीही करता आले नाही.' बरीच चर्चा झाल्यानंतर, तेजस्वी प्रकाश अखेर तिच्या टीमसह आली आणि मेकअप रूममध्ये गेली. एमएक्स प्लेअर टीमने गोंधळ सोडवण्याचा प्रयत्न केला आणि सुरभी चंदनाला ही आत बोलवण्यात आले.दरम्यान, मीडियाला माहिती देण्यात आली की तेजस्वी स्वतंत्र मुलाखती घेणार आहे आणि तिने सर्व नियोजित मुलाखती पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आहे. तेजस्वी प्रकाश आणि सुरभी चंदना यांच्यात असे काय झाले ज्यामुळे तिने अभिनेत्रीसारखी मुलाखत देण्यास नकार दिला हे अद्याप समजलेले नाही, परंतु सुरभी चंदना नाराज होती. ती रागाने कार्यक्रमस्थळावरुन निघून गेली आणि नंतर अनुद सिंग ढाका यांच्या मुलाखतीला उपस्थित राहिली. त्यानंतर, मुलाखतीच्या पुढील फेरीची तयारी सुरू होताच, ती ओशाळून रडत कार्यक्रमस्थळी निघून गेली. काही काळानंतर, तेजस्वी प्रकाश बाहेर पडली आणि मुलाखती देत राहिली.दरम्यान, अनुद सिंग ढाका देखील तेजस्वीवर नाराज असल्याचे दिसून आले. जेव्हा तेजस्वीला सांगण्यात आले की थोड्या ब्रेकनंतर तिच्या आणखी दोन मुलाखती आहेत, तेव्हा अभिनेत्री म्हणाली की तिला ब्रेक नकोय आणि ती दोन्ही मुलाखती सलग देईल.

## हिरोइन डेजी शाह पलाश मुच्छलला म्हणाली 'चांगला माणूस'

**मुंबई :** सलमान खानसोबत काम केलेली अभिनेत्री आणि प्रसिद्ध डान्सर-कोरिओग्राफर डेजी शाहने पलाशचं कौतुक केलं आहे. 'फिल्मीज्ञान' या वेबसाइटला दिलेल्या मुलाखतीत डेजीने पलाशसोबतच्या पहिल्या भेटीचा किस्सा सांगितला. पलाशची बहीण आणि गायिका पलक मुच्छलमुळे डेजीची पलाशशी भेट झाली होती. पलकने डेजीच्या पदार्पणातील 'जय हो' या चित्रपटातील गाणं गायलं होतं. तिथूनच त्यांची मैत्री सुरू झाली होती.या भेटीविषयी डेजी म्हणाली, ङ्गपलाश हा व्यक्ती म्हणून खूप चांगला आहे. मी त्याला दोन-चार वेळा भेटले आहे. पलकने माझ्या 'जय हो' या चित्रपटासाठी गाणं गायलं होतं, त्यामुळे तेव्हापासून मी तिला ओळखते. पलकच्या घरी पार्ट्यांना आणि गणपती पूजाला माझं जाणं-येणं असतंच. तिथेच माझी भेट पलाश मुच्छलशी झाली. तो संगीतकार आणि दिग्दर्शक आहे हे तेव्हाच मला समजलं होतं.ङ्गमी पलाशच्या कुटुंबीयांना भेटले आहे आणि ते खूप सुंदर कुटुंब आहे. त्यांच्या कुटुंबातील सर्वजण अत्यंत नम्र स्वभावाचे आहेत. त्यांचा देवावर खूप विश्वास आहे आणि माझ्या मते त्यांबद्दलची ही खूप चांगली गोष्ट आहे. देवावर विश्वास ठेवणारे लोक अत्यंत सकारात्मक असतात, अशा शब्दांत डेजी व्यक्त झाली. आश्चर्याची बाब म्हणजे स्मृती मंधानाशी लग्न मोडल्यानंतर पलाशवर अनेक आरोप झाले. लग्नाच्या एक दिवस आधी त्याला कोरिओग्राफरसोबत रंगेहाथ पकडल्याचीही जोरदार चर्चा होती. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी पलाश आणि स्मृती लग्नबंधनात अडकणार होते. सांगलीत मेहंदी आणि हळदीचा कार्यक्रम धूमधडाक्यात पार पडला होता.

## मिस्टर आणि मिसेस देवरकोंडा!

### रश्मिका-विजयच्या लग्नाचे फोटो अखेर समोर

**उदयपूर :** गेल्या अनेक महिन्यांपासून ज्या क्षणाची रश्मिका मंदाना आणि विजय देवरकोंडा चे चाहते वाट पाहत होते, तो क्षण अखेर आला . दाक्षिणात्य सुपरस्टार विजय देवरकोंडा आणि 'नॅशनल क्रश' रश्मिका मंदाना आज, २६ फेब्रुवारी २०२६ रोजी विवाहबंधनात अडकले . राजस्थानमधील उदयपूर इथल्या 'आयटीसी मेमेंटोज' या आलिशान हॉटेलमध्ये हा शाही विवाहसोहळा थाटामाटात पार पडला.विजय आणि रश्मिका यांनी आपल्या दोन्ही संस्कृतींचा मान राखत दोन वेगवेगळ्या पद्धतीने लग्न केलं. सकाळी १०:१० वाजता पारंपारिक तेलगू पद्धतीनुसार हा विवाहसोहळा पार पडला. त्यानंतर संध्याकाळी रश्मिकाच्या मूळ संस्कृतीनुसार, म्हणजेच कूर्ग (कोडावा) पद्धतीनं दुसरा विधी संपन्न झाला. या सोहळ्याचा एकही फोटो लीक झाला नव्हता. आता त्यांनी अधिकृतपणे फोटो शेअर करत चाहत्यांनाही त्यांच्या आनंदात सहभागी करून घेतलं आहे.रश्मिकानं खास फोटो आणि कॅप्शन शेअर करत लग्नाचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. या फोटोंमध्ये रश्मिका अतिशय सुंदर दिसत आहे. तिनं लग्नासाठी लाल, सोनेरी, भगव्या रंगाची भरजरी सिल्क साडी नेसली होती, तर विजयनं पारंपारिक पांढरे धोतर आणि लाल रंगाची नक्षीकाम केलेली शाल परिधान केली होती. रश्मिकानं तिच्या इन्स्टाग्रामवर फोटो शेअर करताना



विजयचा उल्लेख 'माझा पती' असा करत एक भावुक पोस्टही लिहिली आहे.लग्नाआधीच्या कार्यक्रमांचीही सोशल मीडियावर मोठी चर्चा होती. २४ फेब्रुवारीपासून या सोहळ्याला सुरुवात झाली होती. यामध्ये विरोश प्रेमिर लीगु चं आयोजन करण्यात आलं होतं. तसंच लग्नाआधी मित्रांसोबत त्यांनी पूल व्हॉलीबॉलचा आनंद लुटला. संगीत सोहळ्यात रश्मिकां तिच्या 'पुष्पा २' मधील 'अंगारों' गाण्यावर ठेका धरला, तर हळदीचे फोटोही प्रचंड व्हायरल होत आहेत.या खाजगी सोहळ्याला केवळ जवळचे नातेवाईक आणि मित्रमंडळी उपस्थित होती. यामध्ये चित्रपट दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगा, तरुण भास्कर, राहुल रवींद्रन आणि अभिनेत्री ईशा रेब्बा यांसारख्या मोजक्या सेलिब्रिटींची उपस्थिती होती.

## विशालच्या विरोधात रुचिताला भडकवण्याचा अनुश्रीचा प्लॅन फ्लॉप, बिग बॉस कपल पुन्हा एकत्र; तन्वीचं आकांडतांडव सुरूच

**मुंबई :** बिग बॉस मराठी ६ 'च्या २६ फेब्रुवारीच्या एपिसोडमध्ये बिग बॉस कॅप्टन्सी टास्क घेतात. पहिल्या फेरीत विशाल तन्वी, दीपाली यांना कॅप्टन्सीच्या फेरीतून बाद करतो. दीपाली विशालला सुनावते. अनुश्री टोळीचे प्लॅन काटा ग्रुपला सांगते. दुसऱ्या फेरीत विशाल आणि राकेशमध्ये बाचाबाची होते. रुचिता दुसऱ्या फेरीत रुचिता बझर दाबते. अनुश्री विशालच्या विरोधात रुचिताचे कान भरते. दुसऱ्या फेरीत रुचिता, राकेश आणि रोशनला कॅप्टन्सीच्या रेसमधून बाद करते. दीपाली उगाच लाग लावण्याचा प्रयत्न करते. अनुश्रीला विशालला कॅप्टन्सीच्या रेसमधून काढायचं असतं.रुचिता म्हणते, 'विशाल आणि माझ्यामधून कोणाला



काढायचं असेल तर मला काढा' त्यावर विशाल रुचिताला म्हणतो, 'मला माहितीये मी बाहेर गेलो तर जनतेच्या व्होटने जाईन, हे लोक मला नाही बाहेर काढू शकत' विशाल रुचिताला समजावतो. तिसऱ्या फेरीत रोशन बझर दाबतो. रोशन प्राजक्ता आणि विशालला कॅप्टन्सीच्या फेरीतून बाद करतो. अनुश्री, विशालच्या चुगलीबद्दल बोलते. अनुश्री, टोळी सोडते. विशाल आणि अनुश्रीमध्ये शाब्दिक चकमक होते. शेवटी, रुचिता कॅप्टन पदाची तिसरी उमेदवार होते. प्रभू, रुचिता आणि अनुश्री या तिघांमध्ये कॅप्टन्सी टास्क होणार, असं बिग बॉस सांगतात.अनुश्री सगळीकडे आग लावून मोठमोठ्याने आरडाओरडा करते. दीपाली आणि तन्वी अनुश्रीला समजावतात. रुचिता विशालला म्हणते, 'मला तुझ्याविरुद्ध नाही बोलायचं, मला तुझ्यासोबत राहायचंय. तुझ्याशिवाय न राहणं मला खटकलंय' रुचिता आणि विशालमध्ये सगळं नॉर्मल होतं. अनुश्री, टोळीतून बाहेर पडल्यामुळे दीपालीला खूप आनंद होतो. तन्वीला अनुश्रीवर संशय येतो.दुसऱ्यादिवशी सकाळी अनुश्री, सागर आणि प्राजक्ताला आपल्या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न करते. तन्वी आणि राखीमध्ये शाब्दिक चकमक होते. राखी मुद्दाम राकेश आणि प्राजक्ताचं नाव एकमेकांसोबत जोडते. बिग बॉस अनुश्री, रुचिता आणि प्रभू यांच्यात कॅप्टन्सी टास्क घेतात. सदस्यांना जोड्यांमध्ये रील्स तयार करून कॅप्टन्सीचे दावेदार असलेल्या सदस्यांसोबत कॉलाबोरेट करायचे असतात. ज्यांचे रील्स जास्त व्हायरल होतील आणि ज्यांचे कॉलाबोरेशन्स जास्त असतील, तो सदस्य कॅप्टन होईल, असं बिग बॉस सांगतात. त्यामुळे आत उद्याच्या भागात कॅप्टन कोण होणार? हे पाहणं उत्सुकतेचं ठरणार आहे.

# चोरी करून पळाला पण मात्र तो पोलिसांच्या सापळ्यात अडकला!




जनसंचलन/ चिखली

चिखली शहरात मोटारसायकल चोरीच्या वाढत्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असताना चिखली पोलिसांच्या डी.बी. पथकाने धडक कारवाई करत अवघ्या काही दिवसांत मोटारसायकल चोरट्याला जेरबंद केले आहे. या कारवाईमुळे गुन्हेगारांमध्ये खळबळ उडाली आहे. दिनांक २० जानेवारी २०२६ रोजी चिखली येथील विश्रामगृहासमोर उभी असलेली हिरो कंपनीची डिलक्स ( २८ २५२१) अज्ञात चोरट्याने लंपास केली होती. याप्रकरणी २७ जानेवारी रोजी तक्रार दाखल होताच चिखली पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्रमांक ७६/२०२६, कलम ३०३ (२) भा. न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस निरीक्षक भुषण गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली डी.बी. पथकाने गुप्त माहितीच्या आधारे जालना जिल्ह्यातील भारज बु. येथे सापळा रचला. संत सावता माळी भवनाजवळ संशयिताच्या घरासमोरच चोरीची मोटारसायकल उभी आढळली. चौकशीत कृष्णा आत्माराम पवार (वय २४) याने उडवाउडवीची उत्तरे दिली; मात्र इंजिन व चेचिस नंबर तपासल्यावर वाहन चोरीचे असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसी खाक्या दाखवताच आरोपीने गुन्हाची कबुली दिली. आरोपीला अटक करून मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली.

# शालोम पॅरामेडिकल कॉलेज बुलढाणा प्रथम सेमेस्टर चा निकाल 100%

जनसंचलन/बुलढाणा

प्रथम सेमेस्टर चा निकाल १००% शालोम पॅरामेडिकल कॉलेज बुलढाणा येथील २०२५-२०२६ फर्स्ट सेमेस्टर चा निकाल नुकताच जाहीर झाला असून शालोम पॅरामेडिकल कॉलेज हा सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून १००% लागला आहे शालोम पॅरामेडिकल कॉलेज चे शिक्षक वृंद चे मार्गदर्शन खरच विद्यार्थ्यांसाठी मोलाचे ठरले आहे तसेच शालोम पॅरामेडिकल कॉलेज चे मॅनेजमेंट अध्यक्ष माननीय विजय पलघामोल सर सचिव डॉ. विशाल पलघामोल सर तसेच SSDN चे प्राचार्य डॉ शालीनी कोठारे मॅडम व डॉ विष्णु गाडेकर सर, डॉ धनंजय पवार सर, डॉ योगेश तायडे सर, मा. जितेश पवार, अश्विनी वाघ मॅडम तसेच दीक्षा मॅडम, पवन एकडे गणेश वाघ सर व शालोम परिवार चे सर्व शिक्षक वृंद आदिनी त्यांचे कौतुक केले व भविष्य साठी शुभेच्छा दिल्या आहे.

# २ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय लोकशाही दिन

जनसंचलन/बुलढाणा

सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी, गाऱ्हाणी आणि प्रशासकीय अडचणींचे वेळेत निराकरण करण्यासाठी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार २ मार्च २०२६ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे जिल्हास्तरीय लोकशाही दिनफ आयोजित करण्यात आला आहे. नागरिकांनी आपल्या प्रलंबित समस्या मांडण्यासाठी या व्यासपीठाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

अर्जासाठी महत्त्वाचे निकष : लोकशाही दिनात तक्रार सादर करताना नागरिकांनी विहित अर्ज केवळ शासनाने ठरवून दिलेल्या विहीत नमुन्यातच असावा, तक्रार किंवा निवेदन केवळ वैयक्तिक स्वरूपाचे असावे (सामूहिक स्वरूपाचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत), अर्जाच्या दोन प्रती, संबंधित लोकशाही दिनाच्या किमान १५ दिवस आधी सादर करणे आवश्यक आहे. तालुका लोकशाही दिनानंतर १ महिन्याने जिल्हा स्तरावर, तर जिल्हा स्तरांनंतर २ महिन्यांनी विभागीय आणि त्यानंतर २ महिन्यांनी मंत्रालयीन स्तरावर अर्ज करता येईल. कोणत्या तक्रारी स्वीकारल्या जाणार नाहीत.तसेच न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व अपील्स , सेवाविषयक किंवा आस्थापना विषयक बाबी. अपूर्ण कागदपत्रे जोडलेले किंवा विहीत नमुन्यात नसलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. स्वीकाराहं नसलेले अर्ज संबंधित विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी ८ दिवसांत पाठवून त्याची प्रत अर्जदारास दिली जाईल.

व्हॉट्सॲप चॅटबॉट सुविधा : नागरिकांच्या सोयीसाठी प्रशासनाने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. आता नागरिक आपल्या तक्रारी आणि अर्ज ९४२३१८४८०४ या व्हॉट्सॲप क्रमांकावर चॅटबॉटद्वारे देखील सादर करू शकतात. जिल्ह्यातील नागरिकांनी आपल्या प्रलंबित समस्यांचे निराकरण करण्यासाठी या लोकशाही दिनाचा सकारात्मक लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

# सैलानी उत्सवासाठी वाहतुकीत बदल; जिल्हाधिकाऱ्यांचे मार्ग वळविण्याचे आदेश

जनसंचलन/बुलढाणा

सैलानी बाबा दर्गा येथील ११९ व्या उरूस महोत्सवासाठी प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे. या महोत्सवाच्या काळात होणारी भाविकांची अलोट गर्दी आणि वाहतूक कोंडी लक्षात घेता, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी वाहतूक मार्गांत बदल करण्याचे आदेश दिले आहेत. २५ फेब्रुवारी ते १२ मार्च २०२६ या कालावधीत हे निर्बंध लागू राहतील. दिनांक २५ फेब्रुवारी ते १२ मार्च २०२६ या कालावधीत महोत्सव साजरा होत असून, २ मार्च रोजी होळी उत्सवात नारळांची होळी, ८ मार्च रोजी संदल मिरवणूक आणि १२ मार्च रोजी फातेहाखानीचा कार्यक्रम पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर अंदाजे ४ ते ५ लाख भाविक सैलानी येथे येणार आहे. त्यानुसार पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांच्या विनंतीनुसार जिल्हादंडाधिकारी बुलढाणा यांनी जिल्हा वाहतूक मार्ग क्रमांक २६ वरील वाहतुकीचे वळविण्याचे आदेश जारी केले आहेत. या कालावधीत एस.टी. बसेस, जड वाहतूक तसेच खाजगी वाहतूक यांना पर्यायी मार्गाचा वापर करणे बंधनकारक राहणार आहे. आदेशाचे उल्लंघन केल्यास मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम १३१ अन्वये योग्य ती कारवाई करण्यात येईल. महोत्सव काळात भाविकांनी प्रशासन व पोलीस विभागाच्या सूचनांचे पालन करावे, असे आदेशद्वारे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.




**पर्यायी मार्ग : १) सध्याचा मार्ग : रायपूर पिंपळगाव सराई सैलानी ढासाळवाडी दुधा. पर्यायी मार्ग : रायपूर मातला केसापूर माळवंडी दुधा २) सध्याचा मार्ग : दुधा घाटनांद्रा ढासाळवाडी सैलानी पिंपळगाव सराई पर्यायी मार्ग : दुधा माळवंडी केसापूर मातला रायपूर**

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# राहुडमध्ये थरकाप उडवणारी घटना! सख्ख्या भावाचाच निर्घृण खून; जाळून राख नदीत फेकल्याची कबुली

**जनसंचलन/ खामगाव**

तालुक्यातील राहुड गावात नात्यांना काळिमा फासणारी संतापजनक आणि अंगावर काटा आणणारी घटना उघडकीस आली आहे. सख्ख्या भावाचा डोक्यात लोखंडी रॉडने प्राणघातक वार करून खून केल्यानंतर त्याचा मृतदेह जाळून राख नदीत फेकल्याची धक्कादायक कबुली आरोपीने स्वतः दिल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी पिंपळगाव राजा पोलीस स्टेशन येथे अप क्रमांक ४७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १०३(१), २३८ व ३(५) अंतर्गत गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील मृतक चेतन संजय इंगळे (वय ३५, रा. राहुड) असल्याची माहिती समोर आली आहे. तर आरोपी म्हणून रोशन संजय इंगळे (वय अंदाजे ३६, रा. राहुड) आणि रवि देविदास राऊत (वय अंदाजे ३६, रा. महाकाल चौक, खामगाव) यांची नावे पुढे आली आहेत.



घटना दिनांक २५ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी साडेएक वाजताच्या सुमारास मृतक व आरोपी यांच्या शेतात घडल्याचे उघड झाले आहे. गावचे पोलीस पाटील विलास देविदास बनसोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार चेतन इंगळे २५ फेब्रुवारीपासून बेपत्ता होता. संशय निर्माण झाल्यानंतर पोलिसांनी शोधमोहीम सुरू केली. यावेळी आरोपी रोशन इंगळे याने थरकाप उडवणारी कबुली देत सांगितले की, त्याने आरोपी क्रमांक २ च्या मदतीने स्वतःच्या भावाच्या डोक्यात रॉडने वार करून त्याचा खून केला. त्यानंतर पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह जाळून त्याची राख नदीत फेकून दिली. या निर्घृण हत्याकांडामुळे राहुड गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नात्यांमधील क्रौर्याचा भयावह चेहरा पुन्हा एकदा समोर आला आहे. सद्यस्थितीत प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. या थरारक गुन्ह्यामागील नेमके कारण काय? याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

---

# राष्ट्रपतींच्या दौऱ्यात पास वाटपात मोठा घोटाळा?

# लोकशाहीचा चौथा स्तंभ रोखला!

## नगराध्यक्षांसह पत्रकारांना हेटाळणी - शेगावात कोण चालवतंय सत्ता?




**जनसंचलन/ शेगाव**

देशाच्या लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारितेलाच जर सत्ताधारी आणि प्रशासनाकडून गप्प बसवण्याचा प्रयत्न होत असेल, तर हे लोकशाहीसाठी गंभीर इशारा मानावा लागेल. मुंबईत शिवसेना (उबाठा) गटाच्या माजी महापौर विशाखा राऊत यांनी महिला पत्रकार शिल्पा नलावडे यांची अवकात काढल्याची घटना ताजी असतानाच, शेगावात पत्रकार समीर देशमुख यांना थेट वृत्तांकनापासून रोखण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. इतक्यावरच थांबता का? तर नाही! महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या शेगाव दौऱ्यादरम्यान प्रशासनाने ङ्गङ्घजागा अपुरीफ्फ असल्याचे कारण देत अनेक पत्रकारांना पास नाकारले. मात्र आश्चर्य म्हणजे, ज्यांना पत्रकारितेचा ङ्गपफ सुद्धा माहिती नाही, अशा चेहऱ्यांना मात्र ङ्गचेहरे पाहूनफ पास वाटप करण्यात आले! यामुळे खरी पत्रकारिता करणाऱ्यांचा संताप अनावर झाला आहे. या मनमानीविरोधात काही पत्रकारांनी सोशल मीडियावर अधिकाऱ्यांचा निषेध नोंदवत त्यांच्या ङ्गआकलीचे तारफ काढले. त्यानंतर काही अधिकारी जागे झाले आणि समजूत घालण्याचा प्रयत्न करू लागले, पण तोपर्यंत उशीर झाला होता. या संपूर्ण गोंधळामुळे सत्ताधारी भारतीय जनता पक्ष चे स्थानिक कार्यकर्तेही नाराज झाले असून काहींनी कार्यक्रमाच्या पत्रिका परत केल्याची चर्चा आहे. धक्कादायक बाब म्हणजे शेगावचे प्रथम नागरिक असलेल्या नगराध्यक्षांनाही पास नाकारण्यात आल्याचा व्हिडिओ काँग्रेस च्या माजी शहराध्यक्षांनी सोशल मीडियावर व्हायरल केला आहे.

पत्रकार, राजकारणी आणि जनसामान्यांमध्ये आता एकच चर्चा रंगली आहे.हा सगळा प्रकार नेमका कोणाच्या इशाऱ्यावर झाला? आणि प्रशासन पत्रकारांना दाबण्याचा प्रयत्न करत आहे का? या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, अशी जोरदार मागणी आता शेगावातून होत आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८